


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २७४ वा | मंगळवार दि १३ जानेवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# डोंगर खंडाळा १४ एकर जमीन प्रकरण नियमबाह्य खरेदीचा घोटाळा, प्रशासन मौनात कोणाच्या पाठबळावर हा खेळ?

## तारे परिवाराची न्यायासाठी झुंज : पुरावे असूनही न्याय दूरच?




### पाठपुरावा



**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा शहरापासून अवघ्या १२ किलो मीटर अंतरावर असलेले डोंगर खंडाळा येथील सामूहिक १४ एकर जमीन खरेदी प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले असून, महसूल, नोंदणी विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र संशय निर्माण झाला आहे. सामाईक सातबाऱ्यातील जमिनीची खरेदी करताना नियम डावलून व्यवहार झाल्याचे स्पष्ट आरोप समोर येत आहेत. बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी सातबाऱ्यावर खोटी नोंद केल्याचा आरोप असून, त्या नोंदींवर लेखी हरकत असतानाही खरेदी प्रक्रिया पुढे रेटण्यात आली. सामूहिक शेती सातबाऱ्यात नोंद असलेले तक्रारकर्ते राहुल मिननाथ तारे व त्यांच्या कुटुंबीयांनी नियमांनुसार आवश्यक असलेली कागदपत्रे सादर न करता अर्धवट व कथित बनावट कागदपत्रांच्या आधारे व्यवहार पूर्ण केल्याचा गंभीर आरोप केला आहे.याबाबत जिल्हा उपनिबंधक कार्यालयात वारंवार पत्रव्यवहार करूनही त्यांच्या हरकतींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. ग्रामीण पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारींवरही आजतागायत ठोस कारवाई नाही. स्पष्ट पुरावे, लेखी तक्रारी असूनही प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी गप्प का, हा प्रश्न उपस्थित होतो.

या प्रकरणाला आणखी खळबळजनक वळण मिळाले आहे. दिलेल्या तक्रारीत सिद्धार्थ भंडारे, उपजिल्हाधिकारी (पुणे विभाग) तथा सामाजिक न्यायमंत्री ना. संजय शिरसाट यांचे ओएसडी यांचा उल्लेख असल्याने प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. दोषींवर कारवाईऐवजी संरक्षण दिले जात आहे का? कायदा काही निवडकांसाठीच वाकतो का? १४ एकर जमीन प्रकरणात नेमकी कोणाची पाठराखण सुरू आहे? राजकीय वजनामुळे नियम पायदळी तुडवले जात आहेत का? तारे परिवाराने उच्चस्तरीय चौकशी, संबंधित अधिकाऱ्यांच्या चल-अचल संपत्तीची तपासणी करून न्याय देण्याची ठाम मागणी केली आहे. तारे परिवाराला न्याय मिळेपर्यंत, दिलेल्या बरेचसे पुराव्यांच्या आधारे हा विषय बातमीपत्रातून सातत्याने लावून धरला जाणार आहे. काही दोषी अधिकारी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई होत नाही तोपर्यंत हे सत्र थांबणार नाही हा इशारा प्रशासनाने गांभीर्याने घ्यावा.

अजून बरेच काही पुढील भागात...

# पाणी देण्याच्या वादातून दोन गटांत मारहाण; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**जनसंचलन/मोताळा**

शेतातील गव्हाला विहिरीतील पाणी देण्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये मारहाणीची घटना सोमवारी (दि. १२) सकाळी दहा वाजताच्या सुमारास लोणघाट शिवारात घडली. या प्रकरणी परस्परविरोधी फिर्यादीवरून दोन्ही गटांतील सहा जणांविरुद्ध बोराखेडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हसन शहा मलंग शहा (रा. कोथळी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १२ जानेवारी रोजी सकाळी ते शेतात असताना शेजारील शेतात फारुख शहा सलीम शहा हा गव्हाला पाणी देत होता. त्याच्यासोबत अरमान शहा इस्माईल शहा व जाकीर शहा बुडन शहा हे उपस्थित होते. दरम्यान, आपण गव्हाला खत टाकले असून, विहिरीतील पाणी गव्हाला सामायिक विहिरीवरून पाणी देण्यावरून वाद, परस्पर विरोधी तक्रारी दाखल घेऊ द्या, असे हसन शहा यांनी सांगितले असता, फारुख शहा याने वाद घातला. त्यानंतर तिघांनी मिळून फारुख याला मारहाण केली. या फिर्यादीवरून तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, दुसऱ्या गटातील फारुख शहा सलीम शहा यांनीही परस्परविरोधी तक्रार दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, ते सामाईक विहिरीतील मोटार सुरू करून शेतातील गहू भिजविण्यास जात असताना हसन शहा यांनी विहिरीतील पाणी घेऊ नको, ही विहिर आमची आहे?, असे म्हणत वाद घातला. यावर विहिर सामाईक असल्याचे सांगितल्यावर हसन शहा यांनी काठीने मारहाण करून जखमी केले. तसेच तोहीद शहा हसन शहा व अयुब शहा मब्बू शहा यांनी मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या तक्रारीवरूनही संबंधित तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, परस्परविरोधी तक्रारींमध्ये सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बोराखेडी पोलिस करीत आहेत.

# शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

येथून जवळच असलेल्या शिंदी येथे एका शेतकऱ्याने घरातच गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १२ जानेवारी रोजी घडली. सुनील उत्तमराव खरात (वय ४५) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. शिंदी येथील सुनील उत्तमराव खरात यांच्याकडे वडिलोपार्जित चार एकर शेती होती. त्यावर एक लाख रुपयांचा बोजा असून, भारतीय स्टेट बँकेचे कर्ज होते. आईच्या निधनानंतर संपूर्ण जबाबदारी सुनील यांच्यावर आली होती. यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले. सोयाबीन, मूग, उडीद ही पिके हातची गेली. गेल्या अनेक वर्षापासून घेतलेल्या कर्जावरील व्याजही वाढत गेले. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती



दिवसेंदिवस खालावत गेली. दोन मुलांच्या शिक्षणाचा खर्च आणि घरचा प्रपंच चालविणे कठीण झाले होते. या मानसिक विवंचनेतून त्यांनी दि. १२ जानेवारी रोजी दुपारी घरातच गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे नातेवाइकांनी सांगितले. पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला. खरात यांच्या पश्चात पत्नी व दोन मुले असा परिवार आहे.

# रणछोडदासांचे पांढरे निशाण



आप्तस्वकियांना बिनविरोध निवडून आणून मंत्र्यांसह बड्या धेंडांनी नगरपालिकांच्या निवडणुकीत रचलेल्या पायावर आता राज्यातील सत्ताधाऱ्यांनी महापालिका निवडणुकीत कळस चढवला आहे. कल्याण-डोंबिवलीने सर्वाधिक २० आणि ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवडपासून ते धुळे-जळगावपर्यंत ६८ नगरसेवकांनी लढतीपूर्वीच विजयाचा गुलाल उधळला, ही विजेत्यांसाठी आनंदाची बाब असली, तरी अशा साट्यालोट्याच्या राजकारणामुळे लोकशाहीची रोज लक्तरे निघत आहेत. राज्यातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे सर्वाधिक ४४ नगरसेवक बिनविरोध आले असून, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या पक्षांनीही बिनविरोध शिलंगणाचे सोने लुटले आहे. आता विरोधी उमेदवारांच्या या माघारीमागे सत्ताधाऱ्यांचा धाकधपटशा आणि प्रलोभन-दबावाचे राजकारण घडल्याचे आरोप सुरू आहेत. धुळ्यात माघारीच्या वादातून गोळीबार झाला, तर सोलापुरात त्यापायी खून पडला. या माघारीमागे दबाव किंवा आमिषे असल्याच्या आरोपांची चौकशी निवडणूक आयोग करणार आहे; परंतु विषय इथवर येईपर्यंत या यंत्रणांनी काय केले, हा प्रश्न आहे. त्यामुळेच निवडणुका-मतदान या प्रक्रिया दिवसेंदिवस ङ्गफार्सफठरू पाहत आहेत. ङ्गनोटाफच्या तरतुदीमुळे बिनविरोध निवड अवैध ठरते, असे मते काही जण मांडत आहेत; परंतु एकच उमेदवार असेल, तर मतदान घेण्याची वेळच येत नसल्याने ङ्गनोटाफ ची तरतूद सध्याच्या कायद्यानुसार लागू होत नाही. या प्रकारांत सत्ताधाऱ्यांनी साम-दाम-दंड-भेद नीतीचा वापर केलाच; तसेच अनेक विरोधकांनीही लढण्यापूर्वीच शस्त्रे टाकली. निवडणुकीपूर्वी आपल्या पक्षाकडे जागा खेचण्यासाठी आणि उमेदवारीसाठी महाविकास आघाडीतही रस्सीखेच झाली. दोन दिवसांतच याच इच्छुकांमधून माघारी कशी सुरू होते, हे कोडेच आहे. अनेक जण या ङ्ग मॅच फिक्सिंग मबाबत सत्ताधाऱ्यांकडे बोट दाखवत आहेत. विरोधी उमेदवारांना ङ्गकोटी-कोटींफचे आमिष दाखवल्याचा आरोप शिवसेना (उबाठा) आणि मनसेसारख्या पक्षांचे नेते करीत आहेत. निवडणूक अधिकाऱ्यांना हाताशी धरून विरोधकांचे अर्ज बाद करणे, त्यांना अर्ज भरण्यासाठी पोहोचू न देणे अशाही तक्रारी आहेत. काही विरोधी उमेदवारांना गुंड-पोलिसांकडूनही दमदाटी झाल्याचे सांगण्यात येते. निवडणूकच नव्हे, तर साऱ्या देशात विरोधकच शिल्लक ठेवायचे नाहीत, अशा अट्टहासाने कोणी पावले उचलत असेल, तर लोकसभेच्या गेल्या निवडणुकीतील ङ्गसक्षम विरोधक हवेतफ या जनादेशाचा अर्थ त्यांनी पुन्हा समजावून घेतला पाहिजे. या घाऊक माघारीचे सर्वाधिक अपश्रेय लढण्यापूर्वीच नांगी टाकणाऱ्या विरोधी पक्षांचे. त्यात शिवसेना (उबाठा), मनसे, काँग्रेस, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, रिपब्लिकन पक्ष आणि वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांचाही समावेश आहे. ङ्गआम्ही पैसे देत असू, तर ते घेणारे तुमचे उमेदवार विकले गेले आहेत का,फ या सत्ताधाऱ्यांच्या प्रतिप्रश्नातही तथ्य आहे. पूर्वी अगदी अनामत रक्कमही वाचण्याची शक्यता नसताना घरोघरी निष्ठेने प्रचार करणाऱ्या जनसंघ-भाजपच्या कार्यकर्त्यांची आठवण येथे होते; पण जे लढायला तयार आहेत, त्यांची उमेदवारी कापून ऐन मैदानात स्वत:ही शस्त्रे खाली टाकणाऱ्या या माघारवीरांवर संबंधित पक्षांनी कठोर कारवाई केली पाहिजे. एखाद्या राष्ट्रीय-राज्यव्यापी पक्षाचा अधिकृत उमेदवार माघार कशी घेऊ शकतो? उमेदवारी देताना त्याबाबत खातरजमा होत नाही? या प्रश्नांना आता अर्थ नाही. कार्यकर्त्यांच्या पातळ झालेल्या पक्षनिष्ठा आणि पक्षश्रेष्ठींचा अस्तंगत वचक, याचेच हे ढळढळीत निदर्शक आहे. एके काळी ठाण्यात तीन मते फुटल्यामुळे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सगळ्याच नगरसेवकांचा राजीनामा घेतला होता; तसा दरारा आणि निष्ठा पुन्हा निर्माण होण्याच्या आशा सध्याच्या राजकारणात शून्य. प्रदेश पातळीवरील वरिष्ठांनी तळागाळातील कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले, तर अशा अनेक सुरस कहाण्या त्यांना ऐकू येतील. महापालिकांच्या स्थायी समितीमधील ङ्गटक्केवारीफपासून सुरू होणारी ही हातमिळवणी आता निवडणुकीत आपल्याच पक्षाच्या कार्यकर्त्यांचा बळी देण्यापर्यंत पोहोचली आहे. सर्वपक्षीय कारभारी त्याचे लाभार्थी आहेत. त्यामुळे स्वार्थासाठी पक्ष आणि कार्यकर्त्यांना दगा देणाऱ्यांना जनतेनेच घरी बसवण्याची वेळ आली आहे.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# भाजपची मोठी कारवाई! २६ जणांचे सहा वर्षांसाठी निलंबन, बड्या नेत्यांचाही समावेश

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजप-शिवसेना महायुतीच्या उमेदवारांच्या विरोधात निवडणूक लढवणाऱ्या २६ बंडखोरांवर भाजपने बडगा उगारला आहे. पक्षशिस्तीचा भंग केल्याचा ठपका ठेवत या बंडखोरांना पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांनी ही कारवाई केली.मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी भाजपने शिवसेना आणि रिपब्लिकन पक्ष आठवले गट यांच्याशी युती केली आहे. या महायुतीमुळे भाजपला मित्रपक्षांना जागा सोडाव्या लागल्या. त्यामुळे उमेदवारी न मिळालेल्या भाजपच्या इच्छुकांनी बंडाचे निशाण फडकवत पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला. मुंबईतील भाजपचे नेते आशीष शेलार, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड यांनी या बंडखोरांच्या भेटीगाठी घेऊन त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, उमेदवारी मागे घेण्याची पक्षाची विनंती त्यांनी धुडकावून लावली. त्यामुळे अखेर भाजपने त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारला.भाजपच्या नेत्यांनी केलेल्या मनधरणीमुळे काही बंडखोरांनी निवडणूक रिंगणातून माघार घेतली आहे. मात्र, माघारीचे प्रमाण तुलनेने कमी आहे. सुनीता यादव यांनी प्रभाग क्रमांक १मधून अधिकृत उमेदवार रेखा यादव यांच्या विरोधात अर्ज भरला होता. मात्र, पक्षाच्या विनंतीनंतर त्यांनी तो मागे घेतला. प्रभाग क्रमांक २२१ मध्ये माजी नगरसेवक जनक संघवी यांनी भाजपचे अधिकृत उम ेदवार आकाश पुरोहित यांना आव्हान देण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, नंतर त्यांनी माघार घेतल्याचे मुंबई भाजपकडून सांगण्यात आले.निलंबनाची कारवाई



करण्यात आलेल्या भाजप बंडखोरांमध्ये प्रभाग क्रम ांक ६०च्या दिव्या ढोले, प्रभाग क्रमांक १७७च्या नेहल अमर शहा, प्रभाग क्रमांक २०५च्या जान्हवी राणे, प्रभाग क्रमांक दोनच्या आसावरी पाटील, प्रभाग क्रमांक १६६चे मोहन आंबेकर, प्रभाग क्रमांक ७३च्या स्नेहाली वाडेकर, प्रभाग क्रमांक १३१च्या धनश्री बगेल, प्रभाग क्रमांक ७४च्या प्रिया मर्गज, प्रभाग क्रमांक १५९च्या शोभा साळगावंकर, प्रभाग क्रमांक ३७ च्या सुचित्रा नाईक, प्रभाग क्रमांक ६१ च्या उर्मिला गुप्ता आदींचा समावेश आहे.गेल्या काही दिवसांपासून अनेक ठिकाणी पक्षश्रेष्ठींचे आदेश असताना स्थानिक पातळीवर त्याला न जुमानता निर्णय घेण्यात आल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे बंडखोरी केलेल्या पदाधिकाऱ्यांवर करण्यात आलेल्या या कारवाईच्या माध्यमातून पक्षात बेशिस्ती खपवून घेतली जाणार नाही, असा कडक इशारा दिल्याचे बोलले जात आहे.

## दोन पिढ्या संधीच्या अपेक्षेत होत्या, पण.. फडणवीस यांचं भाष्य

**मुंबई :** महापालिका निवडणुकीत म हायुतीतील घटक पक्ष एकमेकांवर सडकून टीका करत आहेत; पण राजकीय अवकाशात विरोधकांना जागाच राहू नये यासाठी काही ठिकाणी वेगळे लढण्याचा निर्णय झाला; परंतु एकमेकांवर टीका न करण्याचे ठरवूनही प्रछन्न टीका झाली. पालिका निवडणुका झाल्यावर मात्र सर्व काही ठीक होईल. २०२९ नव्हे; तर त्यानंतरही महायुती अभेद्य राहील, असे फडणवीस म्हणालेमुंबईतील नागरी समस्या सोडविण्यासाठी महायुती सरकारने मोठे विकास प्रकल्प हाती घेतले असून, त्यात सागरी किनारा मार्गाचे विस्तारीकरण, पश्चिम द्रुतगती महामार्गाला समांतर रस्ता, ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा, ईस्टर्न फ्रीवेचा ठाण्यापर्यंतच विस्तार आदींचा सम ावेश आहे. बीकेसीपासून सागरी किनारा मार्गापर्यंत भुयारी मार्ग तयार करण्याचे नियोजन आहे. उपनगरीय गाड्यांचे दरवाजे स्वयंचलित करण्याबरोबरच तिकिटाचे दर न वाढवता सर्व उपनगरीय गाड्या वातानुकूलित करण्याचे नियोजन आहे,' असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईच्या विकासाचे व्हिजन मांडले.मुंबई महापालिका



निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते. त्या वेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले, 'मुंबईतील रस्त्यांचा प्रश्न कायम स्वरूपी सुटावा यासाठी काँक्रिटचे रस्ते बनविण्याचा प्रकल्प राबविण्यात येत आहे.'महापालिकेतील अधिकाऱ्यांच्या वागणुकीबाबत बोलताना फडणवीस यांनी कमालीची नाराजी व्यक्त केली. 'मंत्री-सरकार पाच वर्षांनंतर बदलेल, आपण मात्र येथे कायमस्वरूपी आहोत. अधिकाऱ्यांच्या कालांतराने बदल्या करण्यातही काही अडचणी आहेत. म ुंबई महापालिकेचे वेगळे कायदे आहेत; परंतु सनदी अधिकारी सोडले तर इतर अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्याच पाहिजेत,' असे फडणवीस म्हणाले.म हापालिका निवडणुकीत राज्यभर भाजपत नाराजी उफाळून आल्याचे दिसून येत होते. त्यावर फडणवीस म्हणाले.

## शिवसेनेने 'कमळा'चा सत्तेचा डाव उधळला

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीनंतर शहरात शिवसेना, भाजप यांच्यात रोज चेकमेट सुरु असताना शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या राजकीय खेळीने शुक्रवारी भाजपचा सत्तेचा डाव उधळला आहे. तर भाजपसोबत गेलेल्या राष्ट्रवादीने ऐनवेळी शिवसेनेला पाठिंबा देत उपनगराध्यक्षपद पदरात पाडून घेतले आहे. सत्तेच्या लालसेपोटी धरसोड वृत्ती करणाऱ्या निलंबित काँग्रेस नगरसेवकांची चांगलीच कोंडी झाली आहे. सोमवारी होणाऱ्या पहिल्या सभेपूर्वीच्या ७२ तासात भाजप काय खेळी खेळते, याकडे राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले आहे.अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीच्या घोषणेपासूनच ही निवडणूक राज्यभर वादात आणि चर्चेत राहिली आहे. त्यात निवडणूक निकालानंतर भाजपने नगराध्यक्षपद मिळवले. सत्ता स्थापनेसाठी युतीतील मित्रपक्ष शिवसेनेला विश्वासात न घेता थेट काँग्रेससोबत युती करण्याचा निर्णय घेत, भाजप आणि मुख्यमंत्र्यांनाच ऐन निवडणुकीत अडचणीत आणले. त्यामुळे भाजप, काँग्रेस युतीवरून संतापलेल्या फडणवीस यांनी काँग्रेससोबत युती रद्द करण्याचे आदेश देत स्थानिक भाजप नेतृत्वाला झापले.

## ठाकरेंची युती, व्यासपीठावर 'तो' फोटो, पोडियमवरच्या शब्दानं लक्ष वेधलं

**नाशिक :** तब्बल २० वर्षांनी एकत्र आलेल्या ठाकरे बंधूंची पहिली प्रचार सभा आज नाशकात पार पडली. ठाकरे बंधूंनी त्यांच्या भाषणांमधून भाजपला थेट रडारवर घेतलं. २०१७ ते २०२२ या कालावधीत नाशिकमध्ये भाजपची सत्ता होती. त्याआधी राज यांचा मनसे नाशिकमध्ये सत्तेत होता. त्यामुळे राज यांनी दोन्ही पक्षांच्या कामांची तुलना करत भाजपला लक्ष्य केलं. तर उद्धव ठाकरेंनी भाजपला हिंदुत्त्वाच्या मुद्द्यावरुन झोडपलं. ठाकरे बंधूंनी नाशिकमधून प्रचाराचा श्रीगणेशा केला आहे. पहिल्याच सभेतून दोघांनी भाजपवर शरसंधान साधलं. यावेळी व्यासपीठावरील नेपथ्य रचनेनं लक्ष वेधून घेतलं. व्यासपीठावर ठाकरे बंधूंसह दोन्ही पक्षांचे प्रमुख नेते उपस्थित होते. शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे आणि उद्धव-राज यांचा एकत्र फोटो सगळ्या पाहुण्यांच्या मागे होता. हा फोटो बराच मोठा होता. दोन्ही भाऊ एकत्र आल्याचा संदेश स्पष्ट देणारा फोटो लावण्यात आला होता.प्रमुख वक्त्यांच्या भाषणासाठी व्यासपीठाच्या मधोमध भगव्या रंगाचा पोडियम उभारण्यात आलं होतं. त्यावर दोन्ही पक्षांची निवडणूक चिन्हं होती. त्याखाली शिवशक्ती हा शब्द पांढऱ्या रंगात अगदी ठळकपणे लिहिण्यात आला होता. ठाकरे बंधूंच्या युतीनंतरच्या पहिल्या प्रचार सभेत बाळासाहेबांसोबतचा दोन्ही ठाकरे बंधूंचा भव्य फोटो आणि पोडियमवरील शिवशक्ती शब्द लक्षवेधी ठरले.मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी त्यांच्या भाषणातून मनसेनं २०१२ ते २०१७ या कालवधीत केलेली कामांचा उल्लेख केला. २०१७ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या आश्वासनांची यादीच राज यांनी वाचून दाखवली. यातील किती प्रकल्प, योजना पूर्ण झाल्या, असा प्रश्न राज यांनी विचारला. त्यावर जमलेल्या गर्दीतून नकारार्थी उत्तर आलं. भाजपमध्ये सुरु असलेल्या इन्कमिंगवर राज यांनी सडकून टीका केली. दुसऱ्यांची पोरं कशाला मांडीवर घेता, असा थेट सवाल राज यांनी विचारलातर शिवसेना उबाठाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनीही भाजप वर टिकेचे बाण सोडले. भाजपचं हिंदुत्त्व चुनावी हिंदुत्त्व आहे. ते खरं हिंदुत्त नाही. आजचा भाजप हा उपटसुंभांचा पक्ष झाला आहे. रावणालाही पक्षात घेतील, इतके हे निर्लज्ज झाले आहेत, अशी टीका उद्धव यांनी केली.

# अमोल बालवडकरांसोबत तळवशे व्हायरल झाल्याने खळबळ

**पुणे :** पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. एकीकडे पुण्यात थंडीचा कडाका वाढत असताना दुसरीकडे राजकीय वातावरण मात्र चांगलंच तापलं आहे आरोप प्रत्यारोपांचा धुरळा उडत आहे. अशातच पुण्यामधील एक लक्षवेधी लढत असणाऱ्या प्रभाग क्रमांक नऊ मधील भाजपचे लहू बालवडकर आणि भाजपमधून तिकीट नाकारल्यामुळे राष्ट्रवादीत जाऊन निवडणूक लढवणारे अमोल बालवडकर यांच्यातला संघर्ष आता टोकाला पोहोचला आहे. लहू बालवाडकर यांनी द पोस्ट करत अमोल बालवडकर यांचे कुख्यात गुंड निलेश घायवळ याच्यासोबत चे काही व्हिडिओ शेअर केले आहेत. हे व्हिडिओ बाहेर आल्यामुळे पुण्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे.लहू बालवडकर यांनी शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये कुख्यात गुंड निलेश घायवळ, अमोल बालवडकर मद्य पार्टी करताना दिसत आहेत. हा व्हिडिओ आणि निवडणुकीत बाहेर आल्यामुळे बाणेर बालेवाडी भागामध्ये वातावरण चांगलंच तापलं आहे. हा व्हिडिओ पोस्ट करत लहू बालवडकर यांनी अमोल बालवडकर यांच्यावर टीका करत जोरदार निशाणा साधला आहे. सुसंस्कृत पुण्याची ओळख ही



शांतता, विचारशीलता आणि जबाबदार वर्तनाची आहे. सार्वजनिक जीवनात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून नागरिकांना हीच अपेक्षा असते, असं लहू बालवडकर म्हणाले आहेत.काल रात्रीपासून सोशल मीडियावर प्रसारित होत असलेल्या एका व्हिडिओच्या संदर्भात एवढेच नमूद करावेसे वाटते की, राजकारणात टीका करणे हा अधिकार असू शकतो; मात्र स्वतःच्या वर्तनातून कोणती मूल्ये जपली जात आहेत, हेही तितकेच महत्त्वाचे असते. संस्कृती ही भाषणातून नव्हे, तर कृतीतून दिसून येते. आज जे लोक इतरांवर नैतिकतेचे धडे देताना दिसतात, त्यांच्या स्वतःच्या कृतींबाबत सार्वजनिक चर्चा होत असेल, तर आत्मपरीक्षण अपेक्षित ठरते. बाणेर-बालेवाडी-सुससारख्या सुशिक्षित आणि सुसंस्कृत परिसरातील नागरिकांना गोंधळ, गदारोळ किंवा अशा दृश्यांपेक्षा शांत, विकासकेंद्रित आणि जबाबदार नेतृत्व हवे आहे. राजकीय मतभेद स्वाभाविक आहेत; मात्र दुटप्पी भूमिका आणि विसंगत वर्तन याला पुण्याची संस्कृती कधीच मान्यता देत नाही. येथील नागरिक सुज्ञ आहेत ते शब्दांपेक्षा कृती पाहून निर्णय घेतात, असं देखील लहू बालवडकर म्हणाले आहेत.दरम्यान हा व्हिडिओ बाहेर आल्यानंतर अम ोल बालवडकर यांनी सुद्धा यावर प्रतिक्रिया दिली आहे. माझ्या विरोधात असे ॲनिमेटेड व्हिडिओ बनवण्याचे काम केले काही दिवसांपासून सुरू आहे. या व्हिडिओ संदर्भात मी पोलिसांत तक्रार केली आहे की याची सखोल चौकशी व्हायला हवी. हा व्हिडिओ खरा असो खोटं असो याची सत्यता बाहेर येईलच पण २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मी स्वतः पाहिला आहे की इथल्या नेत्यांनी निलेश घायवळची मदत घेतली आहे.

# अमृतसरमध्ये खंडणी न दिल्याने दिवसाढवळ्या सराफाला तलवारींनी.. ४२५ ग्रॅम सोनं लूटल

**अमृतसर :** पंजाबमधील अमृतसर शहरात आज दिवसाढवळ्या गुन्हेगारीचा एक अतिशय भीषण आणि थरारक चेहरा समोर आला आहे. शहरातील वदर्ळीच्या फ्लावर स्कूल परिसराजवळ एका सराफावर धारदार शस्त्रांनी हल्ला करून सुमारे ४२५ ग्रॅम सोन्याची लूट करण्यात आली. या घटनेने संपूर्ण पंजाबच्या कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे काढले असून परिसरात दहशतीचे साम्राज्य पसरले आहे. अंतार्यामी कॉलनीचे रहिवासी असलेले मुख्तियार सिंग हे सराफ व्यवसायानिमित्त सोन्याचे दागिने घेऊन जात होते. ते फ्लावर स्कूल परिसरात पोहोचले असता, दबा धरून बसलेल्या सशस्त्र आरोपींनी त्यांना



चारही बाजूंनी घेरले. काही समजण्याच्या आतच आरोपींनी आपल्याकडील धारदार तलवारींनी मुख्तियार सिंग यांच्यावर सपासप वार करण्यास सुरुवात केली. हा हल्ला इतका भीषण होता की, वदर्ळीचा रस्ता असूनही मदतीसाठी कोणी पुढे येण्याची हिंमत करू शकले नाही.आरोपी पूर्ण तयारीनिशी आले होते. त्यांनी रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मुख्तियार सिंग यांच्याकडील ४२५ ग्रॅम सोन्याचे दागिने हिसकावून घेतले. या लुटलेल्या सोन्याची किंमत बाजारभावाप्रमाणे लाखो रुपये आहे. लूट केल्यानंतर आरोपी हवेत शस्त्रे नाचवत भरधाव वेगाने घटनास्थळावरून फरार झाले.या घटनेला एक गंभीर पार्श्वभूमी आहे. पीडित मुख्तियार सिंग यांना गेल्या महिनाभरापासून खंडणीसाठी धमकीचे फोन येत होते. यासंदर्भात त्यांनी पोलिसांत तक्रारही केली होती. मात्र, पोलिसांनी वेळीच ठोस पावले न उचलल्यामुळेच आज आरोपींनी खंडणी न मिळाल्याचा सूड अशा पद्धतीने घेतला असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे.घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले असून जखमी मुख्तियार सिंग यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून आरोपींच्या शोधासाठी नाकाबंदी करण्यात आली आहे. 'आरोपींची ओळख पटवण्याचे काम सुरू असून त्यांना लवकरच बेड्या ठोकल्या जातील,' असे आश्वासन अमृतसर पोलिसांनी दिले आहे.

## भरदिवसा अल्पवयीन बहीण-भावावर प्राणघातक हल्ला, आरोपी ताब्यात

**नागपूर :** नागपूर शहरात पुन्हा एकदा प्रेम संबंधांच्या वादातून टोकाची आणि भयावह हिंसा समोर आली आहे. यशोधरा नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिवळी नदी परिसरात अल्पवयीन मुलगी आणि तिच्या भावावर चाकूने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रेमसंबंधांतील असहिष्णुता आणि वाढती हिंसा हा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कुणाल संतापे (रा. यशोधरा नगर) असे आरोपीचे नाव असून तो पीडित अल्पवयीन मुलीच्या शेजारी राहत होता. पूर्वी आरोपी आणि मुलगी यांच्यात ओळख होती. मात्र कुटुंबीयांच्या हस्तक्षेपानंतर मुलीने आरोपीपासून स्पष्टपणे अंतर ठेवले होते. याच गोष्टीचा राग आणि संशय आरोपीच्या मनात साचत गेला. मुलीचे इतर कोणासोबत संबंध असल्याचा संशय त्याने डोक्यात धरला आणि त्यातूनच ही भीषण घटना घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.घटनेच्या दिवशी आरोपीने आधी मुलीच्या भावाशी वाद घातला. सुरुवातीला शाब्दिक वाद झाला, मात्र काही क्षणातच हा वाद हिंसक झाला. संतापाच्या भरात आरोपीने चाकू काढून मुलीच्या भावावर वार केले. अचानक झालेल्या हल्ल्यात तो गंभीर जखमी झाला. भावाला वाचवण्यासाठी मध्ये पडलेल्या अल्पवयीन मुलीवरही आरोपीने निर्दयपणे चाकूचे वार केले. काही क्षणांतच संपूर्ण परिसर रक्तरंजित झाला.घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत जखमी भावंडांना मेयो रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघांची प्रकृती गंभीर होती, मात्र वेळेवर उपचार मिळाल्याने सध्या त्यांची स्थिती स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान, घटनेनंतर फरार झालेल्या आरोपीचा यशोधरा नगर पोलिसांनी वेगाने शोध घेतला. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीद्वारे काही तासांतच आरोपीला अटक करण्यात आली. पोलिसांनी आरोपीकडून हल्ल्यासाठी वापरलेला चाकूही जप्त केला आहे.

## कुख्यात गुंडाला पाठलाग करुन संपवल

**सांगली :** सांगली शहरातील शामरावनगर येथे सराईत गुन्हेगाराचा पाठलाग करून निर्घृणपणे हत्या करण्यात आला. तिघं सराईत गुन्हेगारांनी केलेल्या हल्ल्यात चैतन्य आप्पासाहेब तांदळे हा जागीच ठार झाला. चैतन्य तांदळे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी हत्येचा गुन्हा दाखल होता. काल शुक्रवारी रात्री चैतन्य तांदळे हा शामरावनगर येथील त्याच्या मित्राकडे गेला होता. त्यावेळी त्या ठिकाणी दबा धरून बसलेल्या तिघा सराईत गुन्हेगारांनी त्याच्यावर चाकूने हल्ला चढवला. या घटनेनं शहरात खळबळ उडाली आहे.सांगलीत सराईत गुन्हेगाराची हत्या करण्यात आली आहे. त्याच्यावर जेव्हा हल्ला झाला तेव्हा प्रतिहल्ला करण्यासाठी चैतन्य तांदळे यानेही स्वतः जवळचा चाकू काढण्याचा प्रयत्न केला. परंतु तिघांनी चाकूने चैतन्य याच्या मानेत, डोक्यावर आणि पोटात हल्ला केला. तसेच त्याच्या डोक्यात पेवर ब्लॉक घालून त्याचा खून केला. पूर्व वैमनस्यातून त्याची हत्या झाल्याचं समोर आलं आहे. हल्लेखोरांच्या शोधासाठी स्थानिक गुन्हे शाखा आणि सांगली शहर पोलिसांची पथके रवाना करण्यात आले.

## कर्ज काढून मुलाला किडनीदान, मुलाने हॉस्पिटलमध्येच प्राण संपवले


**जयपूर :** वडिलांनी स्वतःची किडनी दान करुन काही दिवसांपूर्वीच मुलाचे प्राण वाचवले, मात्र मुलाने रुग्णालयाच्या सहाव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. राजस्थानमधील टोंक येथील ठोरिया पचेवर येथे हा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ३६ वर्षीय तरुण गेल्या सात दिवसांपासून किडनी ट्रान्सप्लांट वॉर्डमध्ये दाखल होता. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.३६ वर्षीय हंसराज जाट हा जयपूर येथील एसएमएस रुग्णालयाच्या सुपर स्पेशालिटी ब्लॉकमधील ट्रान्सप्लांट वॉर्डमध्ये किडनीच्या आजारावर उपचार घेत होता. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, आजारामुळे तो खूप त्रस्त झाला होता. मात्र तो कुटुंबाला हे जाणवू देत नव्हता आणि वेदना लपवत होता. अखेर त्याने सहाव्या मजल्यावरुन उडी घेत आयुष्य संपवण्याचा निर्णय घेतला.हंसराजचे वडीलांना गोगाराम यांना जेव्हा मुलाच्या मृत्यूची बातमी समजली, तेव्हा ते पूर्णपणे खचले आणि बेशुद्ध पडले. त्यांना शुद्धीवर आणल्यानंतरही ते बोलण्याच्या मनस्थितीत नव्हते. रडत




रडत त्यांनी सांगितले की 'मी तर मुलाला स्वतः दूध आणि चहा पाजला होता. मग थकव्यामुळे मला झोप लागली आणि हंसराजने सहाव्या मजल्याच्या खिडकीतून खाली उडी मारली. तो कधी बेडवरुन उतरला आणि खिडकीजवळ जाऊन उडी मारली, हे मला कळलेच नाही.'गोगाराम पुढे म्हणाले, 'मी तर मुलाला किडनी देऊन त्याचा जीव वाचवला होता, पण कदाचित देवाला काहीतरी वेगळेच मंजूर असावे.' एवढे बोलून ते पुन्हा रडू लागले. त्यांनी हे देखील सांगितले की, मुलाच्या किडनी ट्रान्सप्लांटसाठी त्यांनी खूप कर्ज घेतले होते. त्यांना वाटले होते की मुलगा ठीक झाल्यावर सर्व काही सांभाळून घेईल, पण मुलगा असे टोकाचे पाऊल उचलेल याची त्यांना कल्पना नव्हती.

# व्यापारी फेसबुकवरील मित्राला भेटायला आग्र्याला गेला अन्..

**आग्रा :** आग्र्याच्या एत्माद्दौला पोलीस स्टेशन परिसरातील रामबाग चौकातून मुंबईतील एका व्यावसायिकाचे अपहरण झाल्याची कहाणी खोटी ठरली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा मुंबईतील व्यावसायिक समलैंगिक फेसबुक मित्राच्या गाडीत बसून स्वतः गेला होता. गाडीत व्हिडिओ बनवण्यावरून त्यांच्यात वाद झाला. त्यानंतर मित्राने त्याचा मोबाईल फोन आणि पैसे हिसकावून घेतले. त्याने त्याच्या मित्रांना फोन केला, त्या व्यावसायिकाला शेतात नेले आणि त्याच्या खात्यातून १.२० लाख रुपये आपल्या खात्यात ट्रान्सफर करुन घेतले. व्यावसायिकाच्या तक्रारीवरून त्या मित्राविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत समलिंगी मित्रासह पाच जणांना अटक केली आहे.मुंबईच्या संगम अपार्टमेंट्स येथील एक साडी व्यापारी ६ जानेवारी रोजी आग्रा येथे आला होता. तो बुधवारी रात्री व्यापारी नेता टीएन अग्रवाल यांच्यासोबत एत्माद्दौला पोलिस ठाण्यात पोहोचला. त्याने सांगितले की तो त्या दुपारी दिल्लीतील एका मित्राला भेटण्यासाठी रामबाग



येथे आला होता. निळ्या कारमधील दोन लोकांनी त्याचे अपहरण केले, त्याला हाथरस येथे नेले आणि त्याला जबर मारहाण केली. त्यांनी त्याला गोळ्या घालण्याची धमकी दिली आणि त्याचा मोबाईल फोन, अंगठी आणि ८५० रुपये हिसकावून घेतले.नंतर त्याने दोन ओळखीच्या व्यावसायिकांकडून २ लाख रुपये उधार घेण्यासाठी दबाव आणला. त्याच्या खात्यात १.२० लाख रुपये जमा केल्यानंतर त्याला सोडण्यात आले. तो कसा तरी घरी पोहोचण्यात यशस्वी झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तपास सुरु केला. व्यावसायिकाला ज्या ठिकाणी जबरदस्तीने गाडीत बसवण्यात आले त्या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. ज्या खात्यात पैसे जमा करण्यात आले त्या खात्याची माहिती देखील मिळवण्यात आली.पोलिसांनी सांगितले की, व्यावसायिक रामबाग चौकातून स्वेच्छेने निळ्या कारमध्ये बसताना दिसला. ज्या खात्यात पैसे जमा करण्यात आले ते खाते हाथरस येथील रहिवासी रामेश्वरच्या नावावर होते. खात्याच्या तपशीलात आरोपीचा मोबाइल नंबर होता, ज्यामुळे त्याचा फोटो मिळाला. पीडित व्यावसायिकाला फोटो दाखवला तेव्हा त्याने त्याला ओळखले. या आधारे, चांडपा पोलिस स्टेशन परिसरात छापा टाकण्यात आला आणि रामेश्वरला अटक करण्यात आली. नंतर, त्याच्या चार साथीदारांना अटक करण्यात आली. पोलिस चौकशीदरम्यान, आरोपी रामेश्वरने सांगितले की तो समलैंगिक आहे आणि फेसबुकद्वारे त्या व्यावसायिकाला भेटला होता. ते एकमेकांना खूप दिवसांपासून ओळखत होते. त्या व्यावसायिकाला त्याच्या समलैंगिकतेचीही माहिती होती.रामेश्वर, त्याच्या मामाचा मुलगा अभिषेक चौधरी, पारस, पिंटू आणि हृतिक यांना अटक करण्यात आली आहे. रामेश्वर हा काही काळापूर्वी फेसबुकवर त्या व्यावसायिकाला भेटला होता. त्यांची मैत्री झाली आणि त्यांनी मेसेंजरवर चॅटिंग सुरू केले. दोघेही समलैंगिक आहेत.

व्यावसायिका या मित्राला सांगितलं की, तो अनेकदा आग्रा येथे येतो. त्यांनी भेटीची चर्चा सुरू केली. बुधवारी, व्यावसायिकाने फोन केला आणि भेटण्याची विनंती केली. त्याने तीन वेळा फोन केला. त्याने सांगितले की तो रामबागला येईल. रामेश्वर त्याच्या मामाची गाडी घेऊन आला होता आणि हृतिक त्याच्यासोबत होता. कारमध्ये बसताच, व्यावसायिकाने त्याचे कपडे काढले. त्याने त्याचा मोबाईल फोन काढला आणि व्हिडिओ काढू लागला. त्याने नकार दिल्याने व्यावसायिक रागावला. ज्यामुळे त्यांच्यात हाणामारी झाली. हाथरसला पोहोचताच त्याचे सहकारी आले. त्यांनी त्या व्यावसायिकाला पकडले आणि शेतात घेऊन गेले. त्यांना वाटले की तो समलैंगिक असल्याने त्याच्या कृत्याबद्दल कोणालाही सांगणार नाही. मात्र, त्याने पोलिसांना अपहरणाची माहिती दिली आणि ही विचित्र घटना उघडकीस आली.

# नव्या हंगामात कोण करणार अंबानींच्या टीमला मार्गदर्शन

**नवी मुंबई :** मुंबई इंडियन्सच्या संघाने आता या नव्या हंगामासाठी एक मोठी चाल खेळली आहे. मुंबई इंडियन्सच्या संघाने या नव्या हंगामासाठी आपल्या टीमच्या प्रशिक्षकपदाची धुरा बदलली आहे. अंबानींच्या संघाला आता कोण मार्गदर्शन करणार, हे आता समोर आलं आहे.हरमनप्रीत नेतृत्व करत असलेला गतविजेता मुंबई इंडियन्स संघ आणि स्मृती मानधना हिच्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरू या संघांत सलामीची लढत रंगत आहे. लीगच्या पहिल्या टप्प्यातील लढती नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियम येथे रंगणार आहेत. 'जेतेपद राखण्याच्या दडपणापेक्षाही यशस्वी पार्श्वभूमीमुळे संघात उत्साह आणि सकारात्मक ऊर्जा आहे. लीगच्या गेल्या तीन मोसमांपैकी दोनवेळा जेतेपदाचा मान आम्हीच पटकावला आहे. यंदाही जेतेपद आम्हीच राखू', असे हरमनप्रीतने आत्मविश्वासाने सांगितले. 'मुंबई हे माझ्यासाठी अतिशय खास शहर आहे. त्यामुळे यंदाचा डब्ल्यूपीएल मोसमही खास ठरेल', असेही हरमनप्रीत म्हणाली.यंदाच्या मोसमात मुंबई इंडियन्सच्या प्रशिक्षकपदाची धुरा ऑस्ट्रेलियाच्या वर्ल्ड कपविजेत्या लिसा काइटली यांच्याकडे देण्यात आले आहे. आधी ही जबाबदारी शार्लोट एडवर्ड्स यांच्याकडे होती. झुलन गोस्वामी या संघाच्या मेंटॉर आणि गोलंदाजांच्या प्रशिक्षक आहेत. पण यंदाच्या मोसमात मुंबई इंडियन्सच्या संघाने आपल्या संघासाठी हा एक मोठा बदल केला आहे.मुंबईच्या शेजारीच असणाऱ्या नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवरील जगज्जेतेपद, वानखेडे, ब्रेबर्न अशा स्टेडियमवर खेळताना नोंदवलेल्या संस्मरणीय खेळी, हरमनप्रीत कौर हिला कायम स्फूर्ती देतात. त्यामुळेच 'हे शहर आणि परिसर माझ्यासाठी खास असून इथे नेहमीच सकारात्मक निकाल मिळतात', अशी प्रतिक्रिया तिने बुधवारी दिली. शुक्रवारपासून महिला प्रीमियर लीग (ड ब्ल्यूपीएल) टी-२० क्रिकेट लीगला सुरुवात होत आहे. त्यानिमित्ताने दक्षिण मुंबईतील एका कार्यक्रमात तिने माध्यमांशी संवाद साधला होता. त्यानंतर पहिल्या सामन्यासाठी ती सज्ज झाली आणि आता पहिल्या सामन्यात मुंबई इंडियन्सची प्रथम फलंदाजी असणार आहे.मुंबई इंडियन्सने आता या नव्या हंगामासाठी एक मोठा बदल केला आहे. या मोठा बदलामुळे मुंबई इंडियन्सचा संघ विजेतेपद पटकावणार का, याची उत्सुकता सर्वांना असेल.



# एक चूक अनब मुंबईने हातातली मॅच गमावली, हरमनप्रीत कौर भडकली

**मुंबई :** WPL २०२६ च्या थरार कालपासून सुरु झाला. पहिल्याच साम न्यात मुंबई इंडियन्सला दारुण पराभवाचा सामना करावा लागला. मुंबई इंडियन्सने बेंगळुरुकडून तीन विकेट्सने पराभव पत्करला. प्रथम फलंदाजी करताना, मुंबई इंडियन्सने १५४ धावा केल्या. त्यानंतर बेंगळुरुने नॅडिन डी क्लार्कच्या मदतीने लक्ष्य सहज गाठले. आता मुंबईने सामना कुठे गमावला आणि त्याला जबाबदार कोण हे कर्णधार करीरपीशिशीं घरीं बोलून दाखवले आहे.

हरमनप्रीत कौर म्हणाली, 'आम्हाला माहित आहे की नॅडिन डी क्लार्ककडे शेवटच्या षटकात आवश्यक तेवढे धावा करण्याची क्षमता आहे. पण मला वाटते की आम्ही शेवटच्या षटकात एकही चांगला चेंडू टाकला नाही, जो आवश्यक होता. कधीकधी असे घडते. आम्ही तिला दोन किंवा तीन संधी दिल्या आणि जेव्हा तुम्ही खेळाडूंना संधी देत राहता तेव्हा ते अधिक मजबूत होतात. आमच्याकडे काही संधी होत्या, पण आम्ही त्या वाया घालवल्या.'हरमनप्रीत कौर म्हणाली, 'मला वाटते की शेवटच्या षटकात एक



चांगला चेंडू - तोच होता. अन्यथा, आम्ही खेळात होतो. आम्ही हा सामना जिंकण्यासाठी आवश्यक असलेले सर्व काही केले. फक्त शेवटचे ते षटक. जर आम्ही एक चांगला चेंडू टाकला असता, तर आम्ही सामना जिंकू शकलो असतो. थझङ मध्ये आम्हाला नेहमीच असे सामने मिळतात आणि आम्हाला माहित आहे की जर आम्ही या सामन्याबद्दल विचार करत राहिलो तर उद्या आम्हाला त्याचा काही फायदा होणार नाही. आम्हाला या सामन्यातून शिकण्याची आणि पुढील सामन्यात आपण कसे चांगले करू शकतो याचा विचार करण्याची गरज आहे.'

# विराटचा खोडकरपणा काही जात नाही

**वडोदरा :** सरावाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये Virat Kohli लक्ष्यवेधून घेतले.रविवारपासून एकदिवसीय मालिका सुरू होत आहे, त्यानंतर एक दीर्घ टी-२० हंगाम आहे ज्यामध्ये न्यूझीलंडविरुद्ध पाच सामन्यांची मालिका, टी-२० विश्वचषक आणि आयपीएल समाविष्ट आहे. विजय हजारे ट्रॉफीमध्ये प्रत्येकी दोन सामने खेळल्यानंतर कोहली आणि रोहितने सुमारे दीड तास भारतीय वेगवान गोलंदाज, फिरकीपटू आणि थ्रोडाऊनचा सामना केला.भारताचे मधल्या फळीतील फलंदाज श्रेयस अय्यर आणि ऋषभ पंत तसेच वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज यांनी गुरुवारी विजय हजारे ट्रॉफीमध्ये आपापल्या राज्य संघांसाठी खेळल्यामुळे तीन तासांच्या सराव सत्रात भाग घेतला नाही. हे तिन्ही खेळाडू शनिवारी संघात सामील होण्याची अपेक्षा आहे. भारताचा कर्णधार शुभमन गिलनेही आपले प्रशिक्षण आणि फलंदाजीचा सराव आरामात पूर्ण केला, डिसेंबरच्या अखेरीस पायाच्या दुखापतीमुळे दक्षिण आफ्रिकेविरुद्धचे शेवटचे दोन टी-२० सामने खेळू शकला नव्हता.

# बांगलादेशचे खेळाडू भीकेला लागले, भारताशी पंगा घेणं पडलं महागात

**नवी दिल्ली :** भारताशी पंगा घेणे आता बांगलादेशला चांगलंच महागात पडलं आहे. कारण बांगलादेशच्या भारतात टी २० वर्ल्ड कप न खेळण्याच्या निर्णयामुळे आता त्यांच्या खेळाडूंवर भीकेला लागण्याची पाळी येणार आहे. टी २० वर्ल्ड कपपूर्वीच आता एक मोठी गोष्ट घडली आहे, ज्यामुळे बांगलादेशवर आता मोठं संकट आलं आहे.बांगलादेशला आपल्या देशातील हिंदूंवर होणारे अत्याचार थांबवता आले नाहीत. बांगलादेशमध्ये निष्पाप हिंदूंवर अत्याचार केले जात आहेत, त्यांचा जीव घेतला जात आहे. पण बांगलादेशमध्ये या गोष्टीला आळा बसण्यासाठी काहीच केले जात नाही. त्यामुळेच भारतीय नागरिकही भडकले आणि त्यांनी बांगलादेशच्या खेळाडूंना भारतात खेळायला देऊ नये, अशी भूमिका घेतली. बीसीसीआयलाही भारतीयांपुढे झुकावं लागलं. त्यामुळे बांगलादेशच्या मिस्ताफिझूर रेहमानला केकेआरने संघाबाहेर केले. बांगलादेशने त्यानंतर आपल्या देशात आयपीएलला बंदी घातली. त्याचबरोबर भारताला धक्का देण्यासाठी टी २० वर्ल्ड कपचे पाऊल उचलले. भारतामध्ये आम्ही वर्ल्ड कपचे सामने खेळणार नाही, असा पवित्रा त्यांनी



घेतला. पण आयसीसीने त्यांची मागणी मान्य केली नाही. अजूनही याबाबत कोणतेच ठोस पाऊल उचलले गेले नसले तरी बांगलादेशच्या खेळाडूंना आता वर्ल्ड कपपूर्वीच एक मोठा धक्का बसला आहे.बांगलादेशच्या खेळाडूंच्या आर्थिक नाड्या या भारताच्या हातात आहेत. कारण बांगलादेशच्या काही महत्वाचा क्रिकेटपटूंना SG या कंपनीने प्रायोजकत्व दिलं आहे. पण बांगलादेशने भारतात न खेळण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे आता एसजी या कंपनीने खेळाडूंचे प्रायोकत्व काढून घेण्याचा निर्णय घेतला आहे. बांगलादेशच्या एका खेळाडूने नाव न घेता ही गोष्ट सांगितली आहे. भारताची एसजी ही कंपनी क्रिकेट उपकरणं बनवत असते, जी बांगलादेशच्या क्रिकेट संघालाही दिली जातात. पण आता कंपनी आपली ही उपकरणंही बांगलादेशला देणार नसल्याचे समोर येत आहेत.

# स्मृती मानधनाच्या RCB ने विजयासह रचला इतिहास

**नवी मुंबई :** स्मृती मानधनाच्या आरसीबीच्या संघाला जे आतापर्यंत कधीच करता आलं नव्हतं, ते या हंगामात पहिल्याच सामन्यात त्यांनी करून दाखवलं. आरसीबीच्या संघाने अखेरच्या चेंडूवर मुंबई इंडियन्सवर विजय साकारला आणि इतिहास रचला. हा सामना संपला आणि त्यानंतर स्मृती मानधनाच्या आरसीबीसाठी ही गुड न्यूज आली आहे.मुंबई इंडियन्स आणि आरसीबी यांच्यातील हा या हंगामाचा सामना चांगलाच अटीतटीचा झाला. कारण या सामन्यात कोणता संघ बाजी मारेल, हे कोणीही सांगू शकत नव्हते. मुंबई इंडियन्सची सुरुवात चांगली झाली नाही. हरमनप्रीत कौरही २० धावाच करू शकली. पण त्यानंतर मुंबईच्या निकोला कॅरी आणि सजीवा सजना यांनी संघाचा डाव सावरला. या दोघींच्या दमदार



खेळींच्या जोरावर मुंबई इंडियन्सच्या संघाने १५४ धावा उभारल्या होत्या. या आव्हानाचा सामना करताना आरसीबीने चांगली सुरुवात केली. पण स्मृती मानधना बाद झाली आणि त्यांचा डाव गडगडला. आरसीबीचा १५५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ५ बाद ६५ अशी अवस्था केली होती. पण आरसीबीच्या नादिन डी क्लर्कने अखेरच्या चेंडूवर फटका मारत संघाला तीन विकेट्स राखून विजयी केले, त्या विजयानंतर आरसीबीने इतिहास रचला.आतापर्यंत मुंबई इंडियन्स आणि आरसीबी यांच्यात थझङ मध्ये बरेच सामने झाले. पण आतापर्यंत जेव्हा जेव्हा मुंबई इंडियन्स आणि आरसीबी हे दोन्ही संघ पहिल्यांदा समोरा समोर आले तेव्हा मुंबई इंडियन्सने आतापर्यंत बाजी मारली होती. हरमनप्रीत कौरच्या मुंबई इंडियन्सने आतापर्यंत आरसीबीबरोबरचा एकही पहिला सामना गमावला नव्हता. स्मृती मानधनाच्या आरसीबीच्या संघाने गेल्या वर्षी स्पर्धेचे जेतेपदही पटकावले होते. पण मुंबई इंडियन्सबरोबरच्या स्पर्धेतील पहिल्या सामन्यात मात्र त्यांना विजय मिळवता आला नव्हता. त्यामुळे हा सामना दोन्ही संघांसाठी महत्वाचा होता. आरसीबीच्या संघाला यावेळी इतिहास बदलण्याची संधी होती, तर दुसरीकडे आपली विजयाची परंपरा कायम राखण्याची जबाबदारी हरमनप्रीत कौरच्या मुंबईच्या इंडियन्सच्या संघावर होती. आरसीबीने या सामन्यात थरारक विजय साकारला आणि मुंबई इंडियन्सला पहिल्या सामन्यात त्यांना या हंगामात आता पराभूत करता आले आहे.थझङ मध्ये मुंबई इंडियन्स आणि आरसीबी हे दोन दिग्गज संघ आहेत. त्यामुळे या दोन्ही संघांचे सामने अटीतटीचे होत असतात. यंदाच्या हंगामातील हा मुंबई इंडियन्स आणि आरसीबी यांच्यातील पहिला सामना चांगलाच रंगतदार झाला. त्यामुळे स्पर्धेच्या या हंगामाची सुरुवात दमदार झाली. त्यामुळे आता हे दोन्ही संघ पुन्हा जेव्हा आमने सामने येतील तेव्हा कोणता संघ बाजी मारेल, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सुपरस्टार नवऱ्याच्या ए ला आँटी म्हणत डिवचायची अभिनेत्री, पार्टीत झालेली ओळख

**मुंबई :** बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार राजेश खन्ना यांची लव्ह लाइफ नेहमीच चर्चेचा विषय बनलेली. अभिनेते जितके त्यांच्या चित्रपटांमुळे चर्चेत असायचे तितकेच त्यांचे नातेसंबंधही चर्चेत होते. त्यांच्या लव्हस्टोरी या एखाद्या सिनेमाच्या स्क्रिप्टप्रमाणेच असायच्या. राजेश खन्ना यांचे लग्न डिंपल कपाडियांशी झाले होते पण अभिनेत्री अंजू महेंद्रूसोबतचे त्यांचे नाते कधीच कोणी विसरले नाही. आज अभिनेत्री अंजू महेंद्रू यांचा वाढदिवस आहे.

मिळालेल्या माहितीनुसार १९६६ मध्ये राजेश खन्ना एक टॅलेंट स्पर्धा जिंकलेले त्याचदरम्यान त्यांची अंजू महेंद्रू यांच्याशी पहिली भेट झाली. जसजसे ते प्रसिद्धीचे





शिखर चढत गेले तसतसे अंजू यांनी त्यांना मोलाचा पाठिंबा दिला, विशेष म्हणजे त्यांचे घर 'आशीर्वाद' देखील सांभाळले. काहींचे म्हणणे आहे की अंजू यांनीच तो

## का होती दोन हसिनांची कॅटफाइट?


बंगला अभिनेत्याला भेट म्हणून दिला होता. पण जसजसे राजेश खन्ना सुपरस्टार बनले तसेतसे ते त्यांच्यावर हक्क बजावू लागले. असे म्हटले जाते की राजेश खन्ना अंजू यांच्या कारकिर्दीत हस्तक्षेप करु लागले होते. राजेश यांनी १९७१ मध्ये अभिनेत्रीला प्रपोज केले पण अंजूने नकार दिला. त्यांनी प्रेमाऐवजी आपल्या करियरला प्राधान्य दिले. या निर्णयामुळे त्यांच्या नात्यात दरी निर्माण झाली आणि एका मोठ्या वळणावर पोहोचली.दरम्यान, अंजू महेंद्रू वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू गॅरी सोबर्सशी जवळीक साधत असल्याच्या बातम्या समोर आल्या, ज्यामुळे त्यांच्या आणि राजेश खन्ना यांच्यात दुरावा निर्माण झाला. अंजू एका मित्रामार्फत गॅरीला भेटल्या आणि त्याने अभिनेत्रीला प्रपोजही केले. अंजूनेही त्यांच्यासोबतचे नाते स्वीकारले, ज्यामुळे राजेशसोबतच्या त्यांच्या नात्यात तणाव वाढला.राजेश खन्ना डिंपल कपाडीयांच्या प्रेमात पडले. अंजू महेंद्रूसोबतच्या ब्रेकअपनंतर राजेश खन्नांच्या आयुष्यात डिंपल कपाडियांची एण्ट्री झाली.

# एक नारी सब पे भारी! अचानक गायब झालेल्या मुलींचा शोध लावणार 'मर्दानी'

**मुंबई :** काही सिनेमांचा प्रेक्षकवर्ग हा फार मोठा असतो. त्यामुळे प्रेक्षक त्या सिनेमाच्या पुढच्या भागाची आतुरतेने वाट पाहत असतात. असाच एक सिनेमा म्हणजे मर्दानी. राणी मुखर्जीची प्रमुख भूमिका असलेल्या या सिनेमाचे पहिले दोन्ही पार्ट यशस्वी झाले. आता या सिनेमाचा पुढचा भाग रिलीज होणार आहे. या सिनेमाचे पोस्टर रिलीज करण्यात आले आहे.

समोर आलेल्या पोस्टरमध्ये राणी मुखर्जी अत्यंत गंभीर लूकमध्ये बंदूक धरून दिसत आहे. तिच्या पाठी अनेक हरवलेल्या मुलांचे पोस्टर आहेत. बॉलिवूडच्या लोकप्रिय पोलीस सीरिजच्या या सिक्वेल मध्ये राणी मुखर्जीला 'मर्दानी ३' मध्ये पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. विशेष म्हणजे या पोस्टरमध्ये रिलीजची तारीख देखील नमूद करण्यात आली आहे.मर्दानी ३ हा चित्रपट ३० जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या रहस्यमय आणि रोमांचक पोस्टरने आधीच लोकांमध्ये उत्सुकता निर्माण केली आहे. आदित्य चोप्रा निर्मित आणि अभिराज मीनावाला दिग्दर्शित या चित्रपटात राणी मुखर्जी मुख्य भूमिकेत आहे.मर्दानी फ्रँचायझीमधील पहिला चित्रपट २०१४ मध्ये प्रदर्शित झाला होता आणि दुसरा २०१९ मध्ये आलेला. या दोन्ही चित्रपटांना चांगला प्रतिसाद मिळाला होता. यावेळी, हा चित्रपट अभिराज मीनावाला दिग्दर्शित करत आहेत आणि






आदित्य चोप्रा निर्मित करत आहेत. या सिनेमाबाबत राणी मुखर्जी म्हणाली की हे पात्र तिच्यासाठी खास आहे आणि ती देशाचे रक्षण करण्यासाठी दररोज कठोर परिश्रम करणाऱ्या खऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना सलाम करू इच्छिते.चाहते बऱ्याच दिवसांपासून या चित्रपटाची वाट पाहत होते, पण आता त्यांची ही प्रतीक्षा संपली आहे. धठक्र प्रॉडक्शन हाऊसने इंस्टाग्रामवर मर्दानी ३ चे पोस्टर रिलीज करून चाहत्यांना खुश केले आहे. ३० जानेवारी २०२६ रोजी राणी मुखर्जींचे चित्रपटगृहात दमदार पुनरागमनाचे साक्षीदार होण्यासाठी सज्ज व्हा. हा चित्रपट ॲक्शन, थ्रिलर आणि भावनांचे एक उत्तम मिश्रण असणार आहे.

# रुचिता जामदार-तन्वी कोलते मध्ये घरातलं पहिलं भांडण

**मुंबई :** बॉस सर्व स्पर्धकाचं स्वागत करतात. शिवाय घरात असणाऱ्या '८०० खिडक्या आणि ९०० दारां'ची ओळख ते करुन देतात. या घरातील प्रत्येक दारामागे काही ना काहीतरी ट्विस्ट असल्याचे बिग बॉस सांगतात. बिग बॉस जाहीर करतात की, बेड-बाथरुम किंवा कोणत्याची सोयीसुविधा आयते मिळणार नाहीत. गोल्डन, सिल्व्हर आणि ब्राँझ रेशन कार्डाची ओळखही करुन दिले जाते. जे मिळवल्यास अनुक्रमे १००%, ५०% आणि २५% रेशन आणि सोयीसुविधा मिळतील. पहिल्या दिवशी १००% रेशन आणि सोयीसुविधा मिळतील असे जाहीर केले जाते. शिवाय दुसऱ्या दिवशी 'तुफान' येणार असेही बिग बॉस सांगतात.पहिल्या दिवशी सगळेजण एकमेकांची ओळख करुन घेण्याचा प्रयत्न करतात. रोशन भजनकर दीपालीला त्याच्या मुलींविषयी सांगतो, तर विशाल कोटीयन प्रभू शेळकेला सांगतो की, तो त्याला 'काल्‌ू डॉन' म्हणणार नाही, तो त्याला आजपासून 'छोटा डॉन' म्हणेल. चहा पिण्यासाठी साखर मिळावी म्हणून वारंवार विनंती करतो. अनुश्री, तन्वी, रुचिता आणि दिव्या या मुलींसोबत होणाऱ्या दुजाभावाविषयी चर्चा करतात. त्यानंतर विशाल जेव्हा प्रभूला उचलून घेतो, तेव्हा प्रभू सांगतो की, त्याच्यासोबत पुन्हा असं वागायचं नाही. विशाल त्याला पुन्हा उचलून घेतो आणि त्याच्याशी अशा भाषेत बोलायचं नाही असं सांगतो. 'तू डॉन नावाने असशील, मी कामाने आहे', असं तो त्याला सुनावतो.या सगळ्या प्रकारानंतर प्रभू बाथरुममध्ये जाऊन रडतो आणि देवीची प्रार्थना करतो. त्यावेळी रोशन त्याची समजूत काढतो आणि थोड्यावेळाने विशालही त्याच्याशी प्रेमाने बोलतो. विशाल त्याला हेही सांगतो की, त्याने मस्ती करण्यासाठी त्याला उचललं होतं. याशिवाय पहिल्याच दिवशी विशाल-तन्वी, अनुश्री-सोनाली, विशाल-ओमकार यांच्यामध्ये छोटेमोठे वाद होतात.

# पदार्पणातच धमाका करणारी अभिनेत्री, एका सहीसाठी नोटांची बंडलं घेऊन निर्माते लावायचे रांग, एका घटनेने संपलं करियर

**मुंबई :** १९९० मध्ये जेव्हा 'आशिकी' प्रदर्शित झाला तेव्हा एका सावळ्या रंगाच्या, तीक्ष्ण व्यक्तिरेखेच्या मुलीला पडद्यावर पाहून संपूर्ण देश वेडा झाला होता. ती मुलगी होती अभिनेत्री अनु अग्रवाल . तिचा आशिकी चित्रपट ब्लॉकबस्टर झाला आणि अनु एका रात्रीत 'आशिकी गर्ल' बनली. पण या प्रचंड प्रसिद्धीमध्ये, एक वेळ अशी आली की अनुला व तिच्या चाहत्यांना जबर धक्का बसला. आज अनु अग्रवाल यांचा वाढदिवस आहे. त्यानिमित्त त्यांच्याबद्दल काही गोष्टी जाणून घेऊ.

एक जुनी मुलाखत आठवत, अनु अग्रवाल म्हणाल्या होत्या की 'आशिकी' च्या यशानंतर निर्माते त्यांच्या घराबाहेर





रांगा लावून उभे राहायचे. गंमतीची गोष्ट म्हणजे, जवळजवळ ९८ टक्के निर्मात्यांकडे पटकथा किंवा कथाही नसायच्या. अनु यांनी सांगितले की, 'लोक माझ्याकडे फक्त पैसे घेऊन येत असत आणि मला चित्रपट साइन करायला सांगत असत. जेव्हा मी त्यांच्याकडे सिनेमाची पटकथा मागायची तेव्हा ते उत्तर द्यायचे की, 'कथा बनेल, फक्त तुम्ही सिनेमा साइन करा.' पण मी एक कलाकार होते; मला पैशांपेक्षा माझ्या भूमिकेची जास्त काळजी होती.'अनु अग्रवाल यांची कारकिर्द जितक्या लवकर उंचीला पोहचली, तितक्याच लवकर नशिबाने त्यांना एक भयानक धक्का दिला. 'आशिकी' नंतर त्यांनी 'किंग अंकल' आणि 'खल-नायिका' सारख्या चित्रपटांमध्ये काम केले. १९९९ मध्ये एका कार अपघातात त्यांचे आयुष्य पुर्णपणे बदलून गेले. अनु २९ दिवस कोमात होत्या. त्यांचा चेहरा आणि शरीर इतके गंभीर जखमी झाले होते की त्यांना ओळखताही येणे मुश्किल झालेले. अनु अग्रवाल यांनी कधीही हार मानली नाही. मृत्यूच्या दारातून परत आल्यानंतर त्यांनी त्यांचब. प्रवासाबद्दल एक पुस्तक लिहिले. आज, चित्रपटसृष्टीच्या ग्लॅमरपासून दूर, त्या योग आणि अध्यात्माद्वारे लोकांचे जीवन सुधारत आहे.आजही, जेव्हा 'सांसों की जरूरत है जैसे' किंवा 'नजर के सामने' सारखी गाणी वाजतात तेव्हा अनु अग्रवाल यांचा निरागस चेहरा लक्षात येतो. अनु आता चित्रपटांमध्ये सक्रिय नसल्या तरी, त्यांचे नाव ९० च्या दशकाच्या चित्रपट इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# उमाळा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन...

**जनसंचलन/बुलढाणा**

तालुक्यातील उमाळा येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील १६ ते २३ जानेवारी कालावधीमध्ये श्री शिव महापुराण कथा ज्ञानयज्ञ सोहळा तथा अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या यामध्ये दररोज पहाटे ४ ते ६ काकडा, ७ ते ८ विष्णू सहस्त्र नाम, ८ ते ९ गीता पारायन, १० ते ११ गाथा भजन, दुपारी १ ते ४ भागवत कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८.३० ते १०.३० हरीकीर्तन, असे दैनंदिन कार्यक्रम असणार आहे. विठ्ठल रूखमिणी मंदिर उमाळा येथे कथाकार भागवताचार्य ह.भ.प. दिनेश महाराज बोडखे, वैजापूर यांच्या रसाळ वाणीतून भाविकांना श्री शिव महापुराण कथेचे श्रवण करता येणार आहे. यादरम्यान १६ जानेवारी रोजी हभप गोपाल महाराज भुसारी, १७ जानेवारी हभप रेणुकाताई महाराज जाधव, १८ जानेवारी हभप क्रांतीताई महाराज, १९ जानेवारी हभप शुभम महाराज गोरे, २० जानेवारी हभप विकास महाराज जाधव, २१ जानेवारी हभप ज्ञानेश्वर माऊली भवर, २२ जानेवारी हभप गणेश महाराज मगर, वेदशास्त्र संपन्न बाजीराव स्वामी वारकरी शिक्षण संस्था, गारज यांच्या हरीकीर्तनांचा लाभ भाविकांना घेता येणार आहे. गायनाचार्य हभप रिंकेश महाराज, हभप वाल्मिक महाराज, हभप अरुण महाराज, हभप सागर महाराज, हभप प्रशांत महाराज, मृदुंगाचार्य योगेश महाराज यांचा समावेश असणार आहे. तर हभप संदिप महाराज सांगळे



यांचे २३ जानेवारीला काल्याचे किर्तन होणार असून त्यानंतर दुपारी १ ते ४ या वेळेत महाप्रसादाचे वाटप होईल. पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन उमाळा वासियांच्या वतीने करण्यात आले आहे.

# दोन गटांत हाणामारी; परस्परविरोधी तक्रारींवरून १३ जणांविरुद्ध गुन्हा

**जनसंचलन/ देऊळगाव राजा** : देऊळगाव मही येथे जुन्या वादातून दोन गटांत हाणामारी झाल्याची घटना ११ जानेवारी रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास घडली. या प्रकरणी दोन्ही गटांनी परस्परविरोधी तक्रारी दाखल केल्या असून, १३ जणांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले. विनयभंग, गैरवर्तन, पैसे व दागिने जबरदस्तीने नेल्याचे गंभीर आरोप तक्रारीतून करण्यात आले आहेत. त्यानुसार १२ जानेवारी रोजी देऊळगाव राजा पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणी रविंद्र दादाराव मुळे (वय ३६, रा. देऊळगाव मही) यांनी दिलेल्या तक्रारीवरून, मधुकर अशोक शिंगणे, ज्ञानेश्वर शिंगणे, सचिन हरीभाऊ शिंगणे, दिनकर रामराव शिंगणे, सिद्धेश्वर म्हस्के, भगवान समाधान शिंगणे, ऋषिकेश जगन्नाथ शिंगणे (सर्व रा. देऊळगाव मही) यांच्यासह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना शिवीगाळ करत मारहाण केली. या दरम्यान अल्पवयीन मुलीवर गैरवर्तनाचा प्रयत्न, महिलांचा विनयभंग तसेच नातेवाईकांना लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय आरोपींनी फिर्यादीच्या घरातून १ लाख ९१ हजार रुपये रोख व सोन्याचे दागिने लंपास करून वाहनाची तोडफोड केल्याचा आहे. आरोप आहे. घर जाळून टाकण्याची व जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही उल्लेख तक्रारीत दुसऱ्या गटातील मधुकर अशोकराव शिंगणे (वय ३६, रा. देऊळगाव मही) यांनी दिलेल्या तक्रारीवरून रविंद्र दादाराव मुळे, दादाराव मुळे, शंकर शिंगणे, गणेश शंकर शिंगणे, अक्षरा मुळे, जान्ती मुळे (सर्व रा. देऊळगाव मही) यांच्यासह इतर ५ ते ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देऊळगाव राजा पोलिस पुढील तपास करीत आहेत. लाख २१ हजारांचे दागिने जबरदस्ती नेल्याचा आरोप

# भादोला परिसरात जुगारावर धाड, २ लाखांचा मुद्देमाल जप्त



**जनसंचलन/बुलडाणा**

तालुक्यातील भादोला येथील तलावाच्या काठावर सुरु असलेल्या जुगारावर रविवारी बुलढाणा ग्रामीण पोलिसांनी धाड टाकली. या कारवाईत सात जणांविरोधात गुन्हा दाखल करून २ लाख ६ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल, चार दुचाकी जप्त करण्यात आली आहे पोलिस उपनिरीक्षक तुकाराम राजपूत यांच्या नेतृत्वाखाली महादेव इंगळे, नारायण गावंडे, ज्ञानेश्वर महाजन यांना मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी धाड टाकली. कारवाईत सिध्दार्थ रामभाऊ गवई (रा. देव्हारी), शेख करिम शेख नाजीर, अजगर शहा अन्वर शहा, श्याम दामोधर ठेंग, भास्कर विष्णू ठेंग, शेख खलील शेख शालम (सर्व रा. भादोला) आणि भगवान नारायण जाधव (रा. देव्हारी) यांना पोलिसांनी जुगार खेळताना रंगेहाथ पकडले. त्यांची अंगझडती घेण्यात आली. त्यात जुगाराचे साहित्य आणि चार दुचाकी असा २ लाख ६ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी सात जणांविरुद्ध बुलढाणा ग्रामीण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. तालुक्यात अवैध धंदे वाढत असून, त्या विरोधात कारवाई सुरुच ठेवण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
**सुकन्या लक्षाधीश ठेव योजना**
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# मातृतीर्थ सिंदखेड राजात जिजाऊभक्तांचा जनसागर !

## राष्ट्रमाता जिजाऊंचा ४२८ वा जन्मोत्सव थाटात साजरा

जनसंचलन/बुलढाणा

राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचा ४२८ वा जन्मोत्सव सोहळा सोमवारी मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने जिजाऊंचे जन्मस्थान असलेल्या मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीत दर्शनासाठी सकाळपासून जनसागर लोटला होता. सकाळी ६ वाजता राजे लखुजीराव जाधव राजवाड्यातील राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थानी वंशज राजे विजयसिंह जाधव, शिवाजीराव जाधव यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. तसेच केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांनी सपत्नीक राजमाता माँ जिजाऊ यांची महापूजा करुन अभिवादन केले. यावेळी आमदार मनोज कायंदे, माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, माजी शशिकांत खेडेकर, नगराध्यक्ष सौरभ तायडे यांनीही राजमाता जिजाऊ माँसाहेब यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. सिंदखेडराजा विकास आराखडा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील - केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेबांना



अभिवादन करुन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रसारमाध्यमांशी बोलतांना सांगितले की, आज राष्ट्रमाता जिजाऊ यांचा ४२८ वा जन्मदिवस आहे. त्यानिमित्त देशभरातून जिजाऊभक्त, शिवप्रेमी जिजाऊ यांच्या जन्मस्थानी येतात. हे मातृतिर्थ सिंदखेड राजा भूमीचे वैभव आहे. या जन्मोत्सवाचा जनमानसात प्रचंड उत्साह दिसून येत आहे. त्यांच्या दर्शनाने अनेकांना नवी प्रेरणा मिळते. राज्य शासनाने सिंदखेड राजा विकास आराखडा जाहीर केला आहे. यातील कामे वेगवेगळ्या विभांगांकडे दिलेली आहेत. या ठिकाणच्या बऱ्याच वास्तू पुरातत्व विभागाच्या अधिपत्याखाली येतात. दरवर्षी या आराखड्यातील नवीन कामे पूर्ण झालेले दिसून येते. पुरातत्व विभागाचे काम अत्यंत बारकाईने केले जात असल्यामुळे कामे पूर्ण व्हायला उशीर लागत असल्याचे स्पष्ट करत त्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून सिंदखेड राजा विकास आराखडा लवकरात लवकर पूर्ण करुन घेण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगितले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती साजरी

जनसंचलन/बुलडाणा

जिल्हाधिकारी कार्यालयात राजमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांनीही राजमाता माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## राजमाता माँ जिजाऊ यांच्या जन्मस्थळी पालकमंत्री, सहपालकमंत्री नतमस्तक



जनसंचलन/बुलडाणा

राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या ४२८ व्या जयंतीनिमित्त आज पालकमंत्री ना. मकरंद पाटील आणि सहपालकमंत्री ना.संजय सावकारे यांनी मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील राजमाता जिजाऊ जन्मस्थान नतमस्तक होवून अभिवादन केले. या दौऱ्यात पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गातील सिंदखेडराजा इंटरचेंज फेज क्र ७ येथे उभारण्यात येणाऱ्या बालशिवबासह राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांच्या पुतळ्याच्या जागेची पाहणी केली. याप्रसंगी आमदार मनोज कायदे, नगराध्यक्ष सौरभ तायडे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील आणि जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## राजमाता माँ जिजाऊ यांना जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांचे अभिवादन



जनसंचलन/बुलढाणा

राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांच्या जन्मोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील आणि जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी सोमवारी सिंदखेड राजा येथील श्री लखुजाराव जाधव राजवाड्यातील जिजाऊ जन्मस्थळी भेट देवून अभिवादन केले. यावेळी त्यांनी जिजाऊ सृष्टीस भेट दिली. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी आदित्य सिंग, तहसीलदार अजित दिवटे, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे, राज्य संघटक मनोहर तुपकर, जिल्हाध्यक्ष रविंद्र चेके, व्यवस्थापक सुभाष कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते.

## मातृतीर्थ सिंदखेडराजा विकासाचा नवीन आराखडा तयार करणार पालकमंत्री मकरंद पाटील यांची माहिती

जनसंचलन/ सिंदखेडराजा

राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या ४२८ व्या जयंतीनिमित्त मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे पालकमंत्री ना. मकरंद पाटील आणि सहपालकमंत्री ना. संजय सावकारे यांनी जिजाऊ माँसाहेब यांच्या जन्मस्थळी नतमस्तक होऊन अभिवादन केले. यावेळी माध्यमांशी बोलताना मातृतीर्थ सिंदखेडराजा विकासासाठी नवीन आराखडा तयार करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. राजमाता जिजाऊ यांचे जन्मस्थान हे प्रेरणादायी असून या ऐतिहासिक स्थळाला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मातृतीर्थ सिंदखेडराजा विकास आराखडा नव्याने तयार करून शासनस्तरावर मंजुरीसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.



या दौऱ्यादरम्यान पालकमंत्री मकरंद पाटील यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग वरील सिंदखेडराजा इंटरचेंज फेज क्रमांक ७ येथे उभारण्यात येणाऱ्या बालशिवबासह राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या पुतळ्याच्या प्रस्तावित जागेची पाहणी केली. याप्रसंगी आमदार मनोज कायदे, नगराध्यक्ष सौरभ तायडे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, ॲड नाझेर काझी सातारा जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष नितीन भरगुडे पाटील, पुणे विभागीयअधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरीश पाटणे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८